




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १३२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२५ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले !

## महाराष्ट्रासाठी, मराठी माणसासाठी ठाकरे बंधू अधिकृतरीत्या एकत्र आले !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधूंनी अखेर एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात बीएमसी निवडणूक साठी युतीची घोषणा करण्यात आली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मुंबईतील वरळी येथील ब्लू सी हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेत युतीची औपचारिक घोषणा केली. यावेळी उद्धव आणि राज यांच्यासह संजय राऊतही व्यासपीठावर होते. तिघांनीही उपस्थितांशी संवाद साधला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार, असं राज ठाकरेंनी ठणकावून सांगितलं. राज ठाकरे काय म्हणाले?





### मुंबईचा महापौर मराठीच होणार व आमचाच होणार!

जाहीर सभा सुरु झाल्या की बाकी बोलायचं ते बोलू. पण माझी एक मुलाखत झाली होती, त्याची मुद्दाम आठवणूक करुन देऊ इच्छितो की, त्यात मी म्हटलं होतं की कुठल्याही भांडण किंवा वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. त्या वाक्यापासून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. असं राज ठाकरे म्हणाले. कोण किती जागा लढवणार, आकडा काय, हे नाही सांगणार. महाराष्ट्रात लहान मुलं पळवणाऱ्या टोळ्या आहेत. त्यात दोन टोळ्या जास्त झाल्यात, ते राजकीय पक्षातील मुलं पळवतात. ज्याची अनेक दिवस वाट पाहिली जात होती, शिवसेना आणि मनसेची युती झाली हे आम्ही जाहीर करत आहोत. अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे यांची ही शेवटची निवडणूक असेल, असं रावसाहेब दानवे म्हणाले होते त्यावरुन पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, संजय राऊत म्हणाले की ते स्वतः निवडणुकीत पराभूत झाले. तर उद्धव ठाकरे म्हणाले, की आपण त्यांच्यावर बोलावं इतकीही त्यांची पातळी उरली नाही.

तर राज ठाकरे यांनी 'देवांच्या प्रश्नांना उत्तरं द्यावीत, दानवांच्या प्रश्नांना नाही' अशी कोटी करत हशा पिकवला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असंही राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितलं. मुख्यमंत्री अल्ला हाफिज बोलतानाचा एक व्हिडिओ फिरतोय. माझ्याकडे खूप व्हिडिओ आहेत, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.

## प्रा.जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर 'विज्ञान रत्न' पुरस्कार



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, मुंबई :** भारत सरकारच्या वतीने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उत्कृष्ट योगदानासाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ चे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज येथे करण्यात आले. प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ कै. प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना 'विज्ञान रत्न' या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले. तसेच अन्य दोन श्रेणींमध्ये महाराष्ट्रातील ६ शास्त्रज्ञ आणि संशोधकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि संशोधकांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी, विज्ञान रत्न, विज्ञान श्री, विज्ञान युवा आणि विज्ञान टीम, या चार श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात आजीवन योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञांना देण्यात येणारा विज्ञानरत्न पुरस्कार प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ कै. प्रा. जयंत विष्णू नारळीकर मरणोत्तर प्रदान करण्यात आला. त्यांच्यावतीने आयुकाचे संचालक डॉ. रघुनाथन श्री आनंद यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्व. नारळीकर यांनी 'होयल-नारळीकर सिद्धांत' विकसित करून गुरुत्वाकर्षण आणि द्रव्य निर्मितीचे एकत्रीकरण करणारा स्थिर अवस्था ब्रह्मांडाचा आराखडा मांडला होता. तसेच, 'क्वासी-स्टेडी स्टेट कॉस्मॉलॉजी' मॉडेलद्वारे कॉस्मिक बॅकग्राउंड रेडिएशन आणि दीर्घिकांच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले होते.


✻ नावात बदल /NAME CHANGE ✻

My Old Name Was Asif Fatemiya Mankar & Old Birth Date 02/04/1967 My New Name is Asif Fattemiya Mankar & New Birth Date- 23/12/1967. My Father Old Name Was Fatemiya Usman Mankar & New Name is Fattemiya Usman Mankar. My Mother Old Name Was Hameeda Fatemiya Mankar & New Name is Hamida Fattemiya Mankar As Per Affidavit Date - 28/11/2025.


## सिडकोची ऐतिहासिक झेप ; आज पासून नवी मुंबई विमानतळ सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** सिडकोचे सर्वात महत्त्वाकांक्षी स्वप्न साकार होत असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबर २०२५ रोजी ३० एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्ससह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिली उड्डाण सेवा सुरू होत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या देशातील अत्याधुनिक ग्रीनफिल्ड विमानतळाच्या यशस्वी उभारणीने भारताच्या पायाभूत विकासाच्या इतिहासात एक सुवर्णाक्षरांनी लिहावा असा अध्याय जोडला गेला आहे. सिडकोची दूरदृष्टी, चिकाटी आणि सक्षम अंमलबजावणीचे हे भव्य प्रतीक असून, २५ डिसेंबर २०२५ रोजी येथून पहिली विमानसेवा सुरू होत आहे. नवी मुंबई, महाराष्ट्र तसेच संपूर्ण देशासाठी हा स्वप्नपूर्तीचा क्षण आहे. या ऐतिहासिक प्रसंगी बोलताना सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. विजय सिंघल म्हणाले : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संचालनास प्रारंभ होणे हे महाराष्ट्र शासन व सिडकोची पायाभूत सुविधा विकासाबाबतची सातत्यपूर्ण बांधिलकी अधोरेखित करते. हा प्रकल्प सिडकोच्या बांधिलकीची हमी देत असून भविष्योन्मुख पायाभूत सुविधा, सर्वसमावेशक विकास आणि जागतिक स्तरावरील कनेक्टिव्हिटीसाठी आमची कटिबद्धता अधोरेखित करतो. या प्रवासात विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे हे सामूहिक यश आहे. या प्रकल्पामध्ये नियोजनापासून प्रत्यक्ष कार्यान्वयनापर्यंत अनेक दशकांचा प्रवास असलेल्या या प्रकल्पामध्ये अत्यंत काटेकोर नियोजन, विविध यंत्रणांमधील समन्वय आणि अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळतो. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील हवाई वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, नियोजित मल्टी-एअरपोर्ट प्रणाली अधिक सक्षम होणार आहे.



या ऐतिहासिक टप्प्याबद्दल नागरिकांचे अभिनंदन करताना विजय सिंघल, सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांनी नवी मुंबईकरांसह महाराष्ट्रातील आणि देशभरातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रत्यक्ष उड्डाण हे जनतेच्या दीर्घकाळच्या स्वप्नाची पूर्तता असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कमळाकृती संकल्पनेवर आधारित अत्यंत आकर्षक टर्मिनल रचनेसाठी अदानी समूह, तसेच एनएमआयएएल यांचे मनःपूर्वक आभार नोंदविले आहेत. ही भव्य रचना आता विमानतळाची एक प्रभावी वास्तुशिल्पीय ओळख बनली असून, भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडविण्यासोबतच शाश्वत विकास, नवोन्मेष आणि जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरते. महाराष्ट्र शासनाने सिडकोसोबत मिळून या ऐतिहासिक प्रकल्पासाठी आवश्यक ठरलेल्या उत्कृष्ट समन्वय आणि सामायिक दूरदृष्टीची दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासन, सिडको, अदानी समूह आणि एनएमआयएएल यांच्यातील सुरळीत व प्रभावी समन्वयामुळे आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आधुनिक विमानतळ पायाभूत सुविधांचा एक मानदंड ठरला असून, महाराष्ट्र व देशासाठी अभिमानास्पद नवे प्रवेशद्वार म्हणून उभा राहिला आहे.

हे विमानतळ कार्यान्वित झाल्याने नवी मुंबईतील नागरिकांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर, जलद आणि सुलभ होणार आहे. तसेच पुणे, ठाणे, पनवेल, रायगड तसेच कोकणातील इतर भागांतील नागरिकांनाही देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासासाठी मोठा लाभ मिळणार आहे. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती, पर्यटनवृद्धी आणि औद्योगिक व व्यापारी गुंतवणुकीला देखील चालना मिळणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी ही या प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. महामार्ग, द्रुतगती मार्ग, उपनगरीय रेल्वे, मेट्रो मार्गिका तसेच प्रस्तावित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे विमानतळाकडे विविध दिशांनी सहज व सुरळीत पोहोचणे शक्य होणार आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) सारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे विमानतळाची कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे. अत्याधुनिक सुविधा, पर्यावरणपूरक रचना आणि भविष्यातील वाढ लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्राला नवे परिमाण देत, देशाचे नवे प्रवेशद्वार म्हणून उदयास येणार आहे.

पहिल्या दिवशीची विमानसेवा २५ डिसेंबर २०२५

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ**

एकूण विमान संचालन पहिल्या दिवशी एकूण ३० एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्स (ATMs)

विमान कंपनी इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, आकासा एअर व स्टार एअर

**महत्त्वाच्या उड्डाण वेळा :**

पहिले आगमन : + ६ए ४६० –
बेंगळुरू येथून सकाळी ०८.०० वा.

पहिले प्रस्थान : +६ए ८८२–
हैदराबादकडे सकाळी ०८.४० वा.

## २५ वर्षीय महिला पोलिसाला लग्नाच्या आमिषाने अत्याचार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** लग्न जुळवणाऱ्या मॅट्रिमोनियल संकेतस्थळांचा गैरवापर करुन, विश्वास संपादन करत प्रेमाचे नाटक आणि लग्नाचे आमिष दाखवून तरुणींना जाळ्यात ओढण्याचे प्रकार वाढत असतानाच नागपूरमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नागपूरमध्ये कार्यरत असलेल्या २५ वर्षीय महिला पोलीस अंमलदाराची एका विवाहित तरुणाने सुनियोजित पद्धतीने



फसवणूक केल्या प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणामुळे सायबर गुन्हे, ऑनलाईन ओळखी आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी असलेला ३० वर्षीय विकिन सूर्यभान फुलारे याने एका नामांकित विवाह नोंदणी संकेतस्थळावर स्वतःला अविवाहित वकील म्हणून सादर केले. याच खोट्या ओळखीच्या आधारे त्याने महिला पोलिसाशी संपर्क साधला. सुरुवातीला चॅटिंग, त्यानंतर व्हिडीओ कॉल्स अशा माध्यमातून त्याने तिचा विश्वास संपादन केला. आपण लग्न करू इच्छित असल्याचे भासवून आरोपीने तिच्याशी भावनिक नाते निर्माण केले. ओळख दृढ झाल्यानंतर आरोपी नागपूरला आला. २८ नोव्हेंबर रोजी त्याने महिलेला लग्नाची मागणी घालून एका लॉजवर नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करण्यात आला. या दरम्यान आरोपीने महिलेचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ चोरट्या पद्धतीने काढल्याचे तपासात समोर आले आहे.




## अटलबिहारी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली.

श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले.

पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले.

त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# सुशासन : लोकशाही मूल्यांची सामाजिक पुनर्स्थापना



२५ डिसेंबर हा दिवस भारतात 'सुशासन दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका प्रशासकीय संकल्पनेचे औपचारिक स्मरण करणारा नसून लोकशाही व्यवस्थेच्या आत्म्याशी निगडित असलेल्या मूल्यांची, प्रक्रियांची आणि सामाजिक जबाबदाऱ्यांची पुनःएकदा चिकित्सा करण्याची संधी देणारा आहे. सुशासन म्हणजे केवळ कार्यक्षम प्रशासन किंवा वेगवान निर्णयप्रक्रिया नव्हे; तर नागरिकांच्या जीवनमानात प्रत्यक्ष सकारात्मक बदल घडवून आणणारी, सामाजिक न्याय, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग या मूल्यांवर आधारित शासनपद्धती होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता सुशासन ही संकल्पना राज्य, समाज आणि नागरिक यांच्यातील परस्परसंबंध अधिक सुदृढ करण्याची प्रक्रिया आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेचा मूलाधार 'जनतेचे, जनतेसाठी आणि जनतेद्वारे शासन' या तत्त्वावर आधारित आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात हे तत्त्व कितपत साकार होते, हा प्रश्न नेहमीच उपस्थित राहतो. याच प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न म्हणजे सुशासनाची संकल्पना होय. समाजशास्त्र हे शासनाकडे केवळ सत्ताकेंद्र म्हणून पाहत नाही, तर ते सामाजिक संस्था, सामाजिक संबंध आणि सत्तावाटपाची प्रक्रिया म्हणून अभ्यासते. त्यामुळे सुशासन म्हणजे केवळ प्रशासकीय सुधारणा नव्हे, तर सामाजिक संरचनेत समता, समावेशन आणि विश्वास निर्माण करणारी व्यापक व्यवस्था आहे.

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला, बहुभाषिक, बहुधर्मीय आणि बहुसांस्कृतिक समाज आहे. अशा समाजात सुशासनाची अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे. सामाजिक विषमता, आर्थिक दारिद्र्य, जातीय भेदभाव, लिंगभाव असमानता, प्रादेशिक असमतोल आणि शैक्षणिक मागासलेपणा या समस्या शासनाच्या कार्यक्षमतेवर सतत प्रश्नचिन्ह उभे करतात. सुशासनाची खरी कसोटी ही अशा वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकांपर्यंत शासनाच्या योजना, सेवा आणि हक्क किती प्रभावीपणे पोहोचतात, यावर अवलंबून असते.

सुशासनाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे पारदर्शकता. पारदर्शक शासन म्हणजे निर्णयप्रक्रिया, धोरणे, निधीवाटप आणि प्रशासनातील कामकाज नागरिकांसमोर खुले असणे. माहितीचा अधिकार कायदा हा पारदर्शकतेच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानले जाते. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले असता पारदर्शकता ही सत्तेच्या केंद्रीकरणावर नियंत्रण ठेवणारी प्रक्रिया आहे. जेव्हा नागरिकांना माहिती मिळते, तेव्हा ते प्रश्न विचारू शकतात, चर्चा करू शकतात आणि सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरू शकतात. त्यामुळे सुशासन हे लोकशाही संस्कृतीच्या वृद्धीचे प्रभावी साधन ठरते.

उत्तरदायित्व हा सुशासनाचा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. शासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संस्था यांनी आपल्या कृतींसाठी जबाबदार असणे आवश्यक आहे. समाजशास्त्र सांगते की उत्तरदायित्वाचा अभाव हा भ्रष्टाचार, मनमानी आणि सत्तेच्या गैरवापराला जन्म देतो. सुशासनात केवळ कायदे असणे पुरेसे नसते, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि दोषींवर कारवाई होणे तितकेच महत्त्वाचे असते. नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी शासनाने स्वतःला सतत जनतेसमोर उत्तरदायी ठेवणे ही काळाची गरज आहे.

लोकसहभाग ही सुशासनाची आणखी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शासन हे केवळ वरून खाली चालणारे यंत्र नसून नागरिकांच्या सहभागातून घडणारी प्रक्रिया आहे. ग्रामसभा, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सल्लामसलत, सामाजिक लेखापरीक्षण यांसारख्या माध्यमांतून लोकांचा सहभाग वाढविणे म्हणजे लोकशाही अधिक सशक्त करणे होय. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की ज्या ठिकाणी लोकसहभाग अधिक असतो, तेथे योजना अधिक प्रभावी ठरतात आणि सामाजिक एकात्मता वाढते. सुशासन म्हणजे शासन आणि समाज यांच्यातील संवादाची दरी कमी करणे.

सुशासन आणि सामाजिक न्याय यांचे नाते अतूट आहे. सामाजिक न्यायाशिवाय सुशासन ही संकल्पना पोकळ ठरते. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक, महिला, दिव्यांग आणि गरीब घटकांसाठी विशेष धोरणे राबविणे हे सुशासनाचे महत्त्वाचे अंग आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने शासनाची खरी जबाबदारी ही समाजातील असमानता कमी करणे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे ही आहे. जर विकासाचे लाभ काही मोजक्या घटकांपुरते मर्यादित राहिले, तर ते शासन सुशासनाच्या निकषांवर उतरू शकत नाही. आधुनिक काळात तंत्रज्ञानाने सुशासनाला नवी दिशा दिली आहे. ई-गव्हर्नन्स, डिजिटल सेवा, ऑनलाइन पोर्टल्स, थेट लाभ हस्तांतरण यांसारख्या उपक्रमांमुळे शासन अधिक वेगवान आणि सुलभ झाले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता तंत्रज्ञान हे केवळ साधन आहे; त्याचा उपयोग कोणासाठी आणि कशासाठी केला जातो, हे महत्त्वाचे आहे. डिजिटल दरीमुळे जर काही घटक शासनाच्या सेवांपासून वंचित राहत असतील, तर ते सुशासनाच्या तत्त्वांना धरून नाही. त्यामुळे तंत्रज्ञानासोबतच सामाजिक समावेशनावर भर देणे आवश्यक आहे.

सुशासनाचा विचार करताना नैतिकता आणि मूल्याधिष्ठित प्रशासन यांचाही उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. शासनव्यवस्थेत नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्यास कोणतेही कायदे किंवा योजना प्रभावी ठरत नाहीत. समाजशास्त्र सांगते की प्रशासनातील मूल्यसंस्कृती ही समाजाच्या एकूण मूल्यसंस्कृतीशी जोडलेली असते. प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठा ही मूल्ये जर प्रशासकीय यंत्रणेत रुजली, तरच सुशासन प्रत्यक्षात साकार होऊ शकते.

आजच्या काळात सुशासनासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, पर्यावरणीय संकटे, बेरोजगारी, सामाजिक संघर्ष आणि राजकीय ध्रुवीकरण यामुळे शासनावर मोठा ताण येतो. अशा परिस्थितीत सुशासन म्हणजे केवळ संकट व्यवस्थापन नव्हे, तर दीर्घकालीन सामाजिक विकासाची दिशा ठरविणे होय. समाजशास्त्रीयदृष्ट्या सुशासन हे स्थिरता आणि परिवर्तन यांच्यातील संतुलन साधण्याची प्रक्रिया आहे.

२५ डिसेंबर रोजी साजरा होणारा सुशासन दिन हा लोकशाही शासनाच्या व्यापक संकल्पनेचे प्रतीक आहे. हा दिवस आपल्याला विचार करायला भाग पाडतो की आपले शासन खरोखरच लोकाभिमुख आहे का, निर्णयप्रक्रियेत सामान्य नागरिकांचा आवाज ऐकला जातो का, आणि विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का. सुशासन दिन म्हणजे आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.

अखेरीस असे म्हणता येईल की सुशासन ही कोणतीही अंतिम अवस्था नसून ती एक सतत चालणारी सामाजिक-प्रशासकीय प्रक्रिया आहे. शासन, समाज आणि नागरिक यांच्यातील परस्पर विश्वास, संवाद आणि सहकार्य यावरच तिचे यश अवलंबून असते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सुशासन म्हणजे केवळ 'चांगले शासन' नव्हे, तर 'न्याय्य, समावेशक आणि मानवी संवेदनांनी युक्त शासन' होय. अशा सुशासनातूनच खऱ्या अर्थाने लोकशाही मजबूत होऊ शकते आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो. सुशासन दिनानिमित्त हीच जाणीव समाजमनात अधिक दृढ होणे, हीच या दिवसाची खरी फलश्रुती ठरेल.

**डॉ.राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## मेरी ख्रिसमस

उत्सवपर्वणीख्रिस्ता
येशूचा जन्म दिवस
वर्षं पुराणे सरताना
उदीत नववर्ष दिवस

शुभेच्छा वर्षा थंडीत
बोला मेरी ख्रिसमस
सकल धर्मीय एकत्र
उत्साहे होई समरस

भेटवस्तु घेता देताना
दावी स्नेहाळ मानस
दुश्मन बनतात दोस्त
गळूनि पडली खुन्नस

सांता दाता प्रतिकृती
दातृत्व करते धाडस
दर्शन देते मानवतेचे
मनात निप्पापपाडस

क्रिसमस ट्री कल्पक
फळे लगडली सकस
नाते बंधन दृढ होता
गळून पडला आकस

सवय लागते मुलांना
देण्याची लागे चुरस
सद्वृत्तीचे बीज पेरले
गोष्टी ऐकताना सुरस

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# पुरोगामी 'हे' आवाहन स्वीकारतील का ?

शहरासारख्या ठिकाणी बहुसंख्य हिंदू असूनही गेल्या काही वर्षांत नाताळ हा सण हिंदूंच्या अन्य सण-उत्सवांप्रमाणे साजरा होऊ लागला आहे. सध्या मोबाईल युग असल्याने अनेक पालक आपल्या पाल्यांना या दिवसांत बाजारात मिळणाऱ्या सांताक्लॉजच्या लाल टोप्या घालून त्यांचे फोटो व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टग्रामवर स्टेटस-स्टोरी म्हणून ठेवतात.

२४ डिसेंबरच्या रात्री सांताक्लॉज येतो आणि लहान मुलांना भेटवस्तू, खाऊ देतो असे सांगून त्यांच्या उशाजवळ स्वतःच भेटवस्तू किंवा खाऊ ठेवतात. रात्री सांताक्लॉजच हे सर्व देऊन गेला यावर कोवळ्या वयातील मुलांचाही विश्वास बसतो. लहानपणी अजाणत्या वयात मुलांना असे काही खोटेनाटे सांगून त्यांच्या मनावर सांताक्लॉज नामक पात्राचे महत्व बिंबवणे खरंच आवश्यक आहे का ? सांताक्लॉज खरंच होऊन गेला का ? किंवा त्याचे आजही अस्तित्व आहे का, याबाबत ख्रिस्ती धर्मगुरुंमध्ये आणि अभ्यासकांमध्ये अनेक मतमतांतरे आहेत.

सांताक्लॉज हे आभासी पात्र असून लहान मुलांमध्ये त्याचे प्रस्थ वाढवण्याची काहीच गरज नाही असे अनेक ख्रिस्ती साहित्याच्या अभ्यासकांचे मत असताना भारतात त्याला अवास्तव महत्व का दिले जात आहे ? 'देव दाखवा आणि बक्षिस मिळवा' अशा प्रकारची आवाहने करून देवाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आणि हिंदू धर्मातील प्रथा परंपरांना नेहमीच अंधश्रद्धेचे लेबल लावून हिणवणारी तथाकथित पुरोगामी विचारांची मंडळी या आभासी पात्राच्या अस्तित्वावर कधीच काही बोलताना दिसत नाहीत.

त्यामुळे हिंदू राष्ट्र समन्वयक समितीने यंदा 'सांताक्लॉज येतो हे सिद्ध करा आणि एक लाख रुपये मिळवा !' असे आवाहन या मंडळींना केले आहे. पुरोगामी हे आवाहन स्वीकारतील का ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# बेडीसगाव येथे ग्रामदेवता भावानीमाता व मरीआई माता प्रथम वर्धापन दिन सोहळा संपन्न

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२३, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील बेडीसगाव येथे ग्रामदेवता भावानीमाता व मरीआई माता प्रथम वर्धापन दिन सोहळा सोमवारी भक्तिभावपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त दिवसभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी भावानीमाता व मरीआई मातेच्या अभिषेकाने झाली. यावेळी मंदिर परिसरात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून माता चरणी श्रद्धेने नतमस्तक झाले. त्यानंतर दुपारी गावातून भव्य पालखी सोहळा काढण्यात आला. पालखी सोहळ्यादरम्यान जय भवानी, जय मरीआईच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

वर्धापन दिनानिमित्त दिवसभर एकदिवशीय ग्रंथ वाचन पारायण (शिवलीलामृत ग्रंथ) आयोजित करण्यात आले होते. ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने या पारायणात सहभाग नोंदवला. सायंकाळी हरिपाठाचे आयोजन करण्यात आले असून, या हरिपाठाने संपूर्ण गावात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. रात्री





भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थ, महिला, युवक तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यानंतर रात्री उशिरापर्यंत संतचरण ह. भ. प. संगीताताई नकुल काठोळे यांची प्रभावी कीर्तन सेवा संपन्न झाली. त्यांच्या कीर्तनातून भक्ती, संस्कार व सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. उपस्थित भाविकांनी कीर्तनाचा मनापासून आनंद घेतला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# हा तर ग्रामीण लोक कलेचा उत्कृष्ट नमुना - अण्णा हजारे

## लोककलावंत मनिषाताई चव्हाण यांचा केला गौरव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्राची पारंपारिक कुलधर्म कुलाचाराची जपवणुक करणारी जागरण गोंधळ या कार्यक्रमात डोक्यावर समई आणि त्यावर पाण्याने भरलेली कळशी घेऊन नृत्य करणाऱ्या मनिषाताई चव्हाण यांची कला म्हणजे ग्रामीण लोककलेचा उत्कृष्ठ नमुना असल्याचे गौरव उद्गार जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी काढले.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील युवा जागरण गोंधळ कलावंत मनिषाताई चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य लोककलावंत सांस्कृतिक विचार मंचच्या पारनेर तालुका महिला अध्यक्षा म्हणून नुकतीच निवड करण्यात आली त्यांच्या निवडीचे पत्र संघटनेचे संस्थापक राज्य अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांनी नुकतेच दिले त्या निमित्ताने अण्णा हजारे यांनी त्यांचा सत्कार करून पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या. अण्णा हजारे पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अगोदरच्या काळापासून लोकसंस्कृतिचे जतन करणारी जागरण गोंधळ कलेने पारंपारिकता जपली पाहिजे त्यातून समाज प्रबोधनाचे शिक्षण मिळाले पाहिजे मनिषाताई चव्हाण सारख्या युवा कलावंतानी ती जबाबदारी घेतली पाहिजे तोच आदर्श नव्या पिढीला घेता येईल.मनिषाताई चे हे लोकनृत्य दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनी झाले पाहिजे असे वाटते त्या संदर्भात आपण मदत करू असेही अण्णा म्हणाले. यावेळी लोकशाहीर दत्ता करंदिकर कार्तिक चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# कर्तव्य पथावरील मुख्य संचलनासाठी बीजेएस महाविद्यालयातील कॅडेट स्वराज भंडारे याची निवड



**अक्षरात : भुषण बावचीकर**

**दि.२४, वाघोली (पुणे) :** भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली येथील एनसीसी कॅडेट स्वराज भंडारे याची नवी दिल्ली येथे कर्तव्यपथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिन २०२६ च्या मुख्य पथसंचलनासाठी निवड झाली आहे. ही निवड प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक असते. यात कठोर शारीरिक व मानसिक चाचण्या, ड्रिलम धील प्रावीण्य, नेतृत्वगुण आणि शिस्त यांची कसोटी लागते. देशभरातील एनसीसी संचालनालये व महाराष्ट्र बटालियनमधून सर्वोत्तम कॅडेट्सची निवड केली जाते. स्वराज भंडारे यांच्या कठोर मेहनत व समर्पणामुळे त्याला महाराष्ट्र संचालनालयाच्या वरिष्ठ विंग तुकडीचे सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. हा सन्मान कोणत्याही एनसीसी कॅडेटसाठी दुर्मिळ मानला जातो. प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर मार्च करताना ते तिरंग्याला व भारताच्या राष्ट्रपती तथा सशस्त्र दलांच्या सर्वोच्च सेनापती श्रीमती द्रौपदी मुरमू यांना सलामी देणार आहेत.वाघोली येथील बीजेएस महाविद्यालयात बी.एस्सी. दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असलेला स्वराज भंडारे हा शिरूर तालुक्यातील वढू बुद्रुक येथील रहिवासी आहे.एका खाजगी कंपनी मध्ये नोकरीला असणारे संजय भंडारे व गृहिणी लता भंडारे यांचा तो पुत्र आहे. बीजेस महाविद्यालयात गेल्या चार वर्षांपासून ३ महाराष्ट्र नौदल एनसीसी विभाग कार्यरत आहे. या विभागात दरवर्षी ७० कॅडेट्सना प्रशिक्षण दिले जाते. यापूर्वी महाविद्यालयातील कॅडेट कॅप्टन पवन राठोड याने आयएनएस शिवाजी, लोणावळा येथील ऑल इंडिया नौसैनिक शिबिरात महाराष्ट्राचे नेतृत्व केले होते.या यशाबद्दल महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंखे, प्राचार्या डॉ. मनीषा बोरा, ३ महाराष्ट्र नेव्हल युनिट एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कमांडर आपलेश मोहन, कमांडिंग ऑफिसर ले. कमांडर सुदर्शन भूषण, मुख्य प्रशिक्षक निखिल मोरे,पीआय स्टाफ राजू खान,एनसीसी अधिकारी सब लेफ्टनंट डॉ. शिवाजी सोनवणे, सीटीओ चक्रधर शेळके, कार्यालय अधीक्षक शाम पाटील तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थ्यांनी स्वराजचे अभिनंदन केले. हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

# जिल्हा परिषद शाळा गेगाव येथे क्रीडा साहित्याचे वाटप



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** आधारवड सामाजिक संस्थेच्या सौजन्याने जिल्हा परिषद शाळा गेगाव येथे भावपूर्ण वातावरणात क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले. मुलांमध्ये प्रिय असणारे, मुलांनी सदा आनंदी राहून नवनिर्मितीचा वसा घेत सर्वगुण संपन्न व्हावे. म्हणून धडपड करणारे अल्याणी केंद्राचे केंद्रप्रमुख स्वर्गीय डॉ.राजेंद्र चौधरी यांना सर्वप्रथम भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. खेळाविषयी त्यांचे प्रेम आणि आवड यांचे स्मरण करून आधारवड सामाजिक संस्थेच्या वतीने शाळेस विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे क्रीडा साहित्य देण्यात आले. यावेळी इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना पाटी व इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड ही वाटप करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी आधारवड सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी अर्थात आधारवड परिवार, शहा चंदुलाल सरूपचंद विद्यालयाचे प्राचार्य गोपाळ वेखंडे, महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक व गेगाव शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र भोईर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# लंकाबाई वंजाळ यांचे निधन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** खापरखेडा येथील वार्ड क्रमांक २ निवासी मनोहर व अशोक बापुराव वंजाळ यांच्या मातोश्री लंकाबाई बापुराव वंजाळ यांचे बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री अंदाजे ८.४५ वाजताच्या सुमारास प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. दिनांक गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता खापरखेडा येथील त्यांच्या निवासस्थानाहून अंत्ययात्रा निघेल व खापरखेडा-कोराडी मार्गावरील कोलार नदीच्या घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# टाकळी ढोकेश्वर गणातून अरुणा खिलारी यांची राहणार उमेदवारी

## अरुणा खिलारी यांच्या उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचा एकमुखी पाठिंबा





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच अरुणा खिलारी यांनी टाकळी ढोकेश्वर गणातून उमेदवारी करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. नुकत्याच पार पडलेल्या खासदार निलेश लंके समर्थकांच्या बैठकीत खिलारी यांच्या नावाची उमेदवारीसाठी एकमुखी मागणी कायकर्त्यांनी केली. या बैठकीत टाकळी ढोकेश्वर गणाम धील गावातील अनेक युवा कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकी दरम्यान खासदार निलेश लंके यांचे कट्टर खंदे समर्थक निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी महाविकास आघाडीम धील नेत्यांशी समन्वय साधून वरिष्ठांनी या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पक्षाकडून टाकळी ढोकेश्वर गणातून निवडणुकीसाठी तयारी दर्शवली असून, त्यांनी आपल्या पत्नी सरपंच अरुणा खिलारी यांना उभे करणार असल्याचे स्पष्ट केले. गणातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी व जनतेच्या सेवेसाठी आपल्या ताकदीने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सरपंच अरुणा खिलारी ३० वर्षांपासून टाकळी ढोकेश्वर गावात अनेक विकासात्मक कामांची पायाभरणी करून पार पाडली आहेत. निलेश लंके प्रतिष्ठानच्या म ाध्यमातून करोना महामारीच्या काळात बाळासाहेब खिलारी यांनी खासदार निलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. त्यांच्या नेतृत्वशैलीम ुळे स्थानिक पातळीवर मजबूत जनसंपर्काचे जाळे निर्माण झाले आहे. बाळासाहेब खिलारी यांचा सर्वच घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांशी लोकसंपर्क, राजकीय कसब आणि समाजातील सर्व स्तरात असलेली चांगली प्रतिमा पाहता विकासात्मक कामातून त्यांनी स्थानिकांमध्ये विशेष विश्वास निर्माण केला आहे.

बाळासाहेब खिलारी हे खासदार निलेश लंके यांचे विश्वासू सहकारी असून लंके परिवाराशी असलेल्या घट्ट नात्यामुळे आणि एकनिष्ठ कार्यशैलीम ुळे त्यांचा प्रभाव केवळ गावापुरता मर्यादित न राहता संपूर्ण टाकळी ढोकेश्वर गटात वाढला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक कार्याचा वारसा असून, तरुण कार्यकर्त्यांशी असलेला त्यांचा संवाद, संघटनात्मक कौशल्य आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्यांच्या उमेदवारीला टाकळी ढोकेश्वर गटातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. पार पडलेल्या समर्थकांच्या बैठकीत सामाजिक कार्यकर्ते मोहनराव रोकडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी टाकळी ढोकेश्वर गटात परिवर्तनासाठी तरुण नेतृत्वाची गरज आहे,असे मत मांडले. या पार्श्वभूमीवर अरुणा खिलारी यांच्या नावाची उमेदवारीसाठी एकमुखी मागणी कार्यकर्त्यांनी केली असून त्यांनी या आव्हानासाठी तयारी दर्शवली आहे.

बैठकीत अरुणा खिलारी यांना टाकळी ढोकेश्वर गणातील भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, ढोकी, टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ, गाजदीपूर, खडकवाडी, मांडवे खुर्द, देसवडे या गावातील आजी -माजी सरपंच, सदस्य चेअरमन संचालक यांचा खंबीर पाठिंबा दिला असून सरपंच अरुणा खिलारी यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

> आरक्षण जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीमधील नेत्यांशी समन्वय साधून जागावाटपाची चर्चा झाली आहे. वरिष्ठांनी या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने टाकळी ढोकेश्वर गणाची जागा लढण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. महाविकास आघाडीमधील नेत्यांनी ही याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे अरुणा खिलारी यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे सभापतीपद महिलेला असल्यामुळे खिलारी यांना गटामधील गावातील व वरिष्ठ कार्यकर्त्यांचा विश्वास आहे की, खिलारी यांनाच उमेदवारी मिळण्याची शक्यता अधिकच बळावली आहे. सध्या अरुणा खिलारी या टाकळी ढोकेश्वर गणातील जनसंपर्क मोहीमील गती देत आहेत. स्थानिक महिला, युवक आणि विविध सामाजिक घटकांशी गाठीभेटी, संवाद व कार्यकर्त्यांशी बैठकांचे सत्र सुरू झाले असून स्थानिक नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

# दारूच्या विळख्यात तरुणाई; व्यसनामुळे दोन चुलत भावांचा दुर्दैवी मृत्यू

## त्यांच्या धक्क्यातून आईचा ही मृत्यू







**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२४, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे एका महिन्यात दारूच्या व्यसनाने दोन चुलत बंधूंचा भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली असून, त्या धक्क्यातून सावरतानाच आईचाही मृत्यू झाल्याची घटनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. अवघ्या ३० ते ४० वयोगटातील हे दोन्ही तरुण दारूच्या आहारी गेल्याने गंभीर आजारी पडले होते.

उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. अजय रामसिंग रजपूत व रमेश नरसिंह रजपूत राहणार कुंभारी अशी दोन्ही चुलत भावांची नावे आहेत. या धक्क्यातून सावरतानाच रमेश रजपूत यांच्या मातोश्री अन्नपूर्णा रजपूत यांचा ही मृत्यू सोमवारी झाला. या घटनेला आणखी भीषण पार्श्वभूमी आहे. रमेश रजपूत वडीलही याचे दारूच्या व्यसनामुळे आजारी पडून पूर्वीच मृत्युमुखी पडले होते.

दारूच्या व्यसनातून झाल्याचे नातेवाईक सांगतात. एकाच कुटुंबातील पिढ्यांपिढ्या दारूच्या आहारी जाऊन होणारे मृत्यू ही बाब समाजाला अंतर्मुख करणारी आहे.कुंभारी परिसरात दारूचे व्यसन ही गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, या भागात दारू पिऊन आजारी पडून मृत्यू पावलेल्यांची संख्या शेकडोंच्या घरात आहे. अनेक घरांमध्ये दोन ते तीन तरुण दारूच्या व्यसनात अडकलेले असून, कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत.

रोजगार, शिक्षण आणि आरोग्य या सर्वांवर या व्यसनाचा घातक परिणाम दिसून येत आहे. विशेष म्हणजे तरुण वयातच शरीरावर दारूचे गंभीर दुष्परिणाम होत असून, यकृताचे आजार, किडनी निकामी होणे, मानसिक अस्थैर्य अशा कारणांनी मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. तरीही या परिसरात सहज उपलब्ध असलेली बेकायदेशीर दारू, खुलेपणाने सुरू असलेले हातभट्टे आणि प्रशासनाची ढिसाळ कारवाई यामुळे परिस्थिती अधिकच बिघडत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी प्रशासनाकडे ठोस उपाय योजनां करण्याची म ागणी केली आहे. दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी, अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाई, व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी, तसेच तरुणांसाठी समुपदेशन व रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

कुंभारीतिल दोन चुलत भावांचा मृत्यू त्यानंतर आईचा मृत्यू ही केवळ एक घटना नसून, दारूच्या व्यसनामुळे होत असलेल्या सामाजिक विनाशाची जिवंत साक्ष आहे. आता तरी प्रशासन, समाज आणि कुंभारी परिसरातील महिलांनी व त्यांच्या कुटुंबांनी एकत्र येऊन या व्यसनाविरोधात लढा उभारला नाही.

# प्रांताधिकारी यांच्या सकारात्मक आश्वासनानंतर मराठा समाजाचे उपोषण स्थगित

## पाटण येथे सकल मराठा समाजाचे होणार होते उपोषण




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण (सातारा) :** मराठा समाजाच्या कुणबी प्रमाणपत्रासाठी न्याय व विधी आधारित पूर्ततेसाठी उपविभागीय अधिकारी उपविभाग पाटण यांच्या कार्यालयात मराठा समाज सेवकांच्या समवेत झालेल्या बैठकीत प्रांताधिकारी सोपान टोंम्पे यांनी सकारात्मक भूमिका दाखवत स्थानिक पातळीवर कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर शासन निर्णयानुसार सुलभता आणून मराठा समाजाला न्याय दिला जाईल असे आश्वासन दिले यामुळे सकल मराठा समाजाने आज पासून पुकारलेल्या आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले असल्याचे जाहीर केले.

यावेळी तहसिलदार अनंत गुरव, नायब तहसिलदार पंडित पाटील, मंडलाधिकारी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. पाटण तहसिल कार्यालयातून कुणबी प्रमाणपत्रांसाठी नियमबाह्य व चुकीच्या त्रुटी काढून कुणबी प्रमाणपत्र देण्यास होत असलेल्या विलंब तसेच मराठा समाजाच्या न्याय व विधि- आधारित मागण्यांच्या पूर्ततेसाठी सकल मराठा समाज पाटण तालुक्याच्या वतीने बुधवार, दि.२४ डिसेंबर पासून पाटण तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी सातारा, प्रांताधिकारी पाटण व पोलिस स्टेशन पाटण यांना सकल मराठा समाज पाटण तालुक्याच्या वतीने देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने प्रांताधिकारी सोपान टोंम्पे यांनी प्रांत कार्यालयात सकाळी ११ वा मराठा सेवकांच्या समवेत बैठक बोलावली होती. या बैठकीत पाटण तहसिल कार्यालयात कुणबी प्रमाणपत्रासाठी शासन निर्णया व्यतिरिक्त चुकीच्या लावल्या जाणाऱ्या त्रुटी, नियमबाह्य नियमावली लावून कुणबीचे अर्ज नाकारले जात असल्याच्या संदर्भात सखोल चर्चा झाली असता यावेळी प्रांताधिकारी सोपान टोंम्पे यांनी सकारात्मक भूमिका दाखवत स्थानिक पातळीवर कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर शासन निर्णयानुसार सुलभता आणून मराठा समाजाला न्याय दिला जाईल असे आश्वासन दिले असता सकल मराठा समाजाने आज पासून पुकारलेल्या आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले असल्याचे मराठा सेवकांनी जाहीर केले.

यावेळी मराठा सेवक यशवंतराव जगताप, राजेंद्र निकम, राहुल शेडगे, विवेक कुराडे, प्रशांत पाटील, शंकरराव मोरे, प्रदीप घाडगे, वसंतराव टोळे, लक्ष्मण चव्हाण, राजाभाऊ काळे, शिवाजी निकम, शामराव मोरे, प्रविण लुगडे, अनिल भोसले, अमोल काजारी, शंकरराव मोहिते, विद्या म्हासुर्णेकर, चंद्रकांत मोरे, अजय कवडे, महेंद्र चव्हाण, वामनराव साळुंखे आदी मराठा समाज सेवक उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांनी आधारभूत धान खरेदी नोंदणीची मुदत ३१ जानेवारी पर्यंत वाढवली

## मुनगंटीवार यांच्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधारभूत धान खरेदीची मुदत ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वाढविण्याची मागणी मंजूर केली आहे.



आधारभूत धान खरेदी नोंदणीची अंतिम तारीख ३१ जानेवारी पर्यंत वाढवून देण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली होती. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील मुल, बल्लारपूर आणि पोंभुर्णा तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन ही मागणी करण्यात आली. आता आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवार, दि. २३ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संदर्भातील विविध समस्यांवर चर्चा केली. तसेच आधारभूत धान खरेदीची मुदत वाढविण्याची देखील मागणी केली. मुख्यमंत्री महोदयांनी ही मागणी तात्काळ मंजूर करीत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी यासंदर्भात आ.सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन सादर केले होते. बल्लारपूर विधानसभा क्षेत्राअंतर्गत चंद्रपूर, मुल, बल्लारपूर व पोंभुर्णा तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात धानाचे पिक घेत असतात. यावर्षी धान उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून आधारभुत धान खरेदी नोंदणीची मुदत दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आहे. बाजार समितीचे कर्मचारी निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची नोंदणी होवू शकली नाही. दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी न झाल्यास धान उत्पादक शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी ३१ डिसेंबर २०२५ नंतर पुढील एक महिन्याकरीता (३१ जानेवारी २०२६ पर्यंत) नोंदणीची तारीख वाढवून द्यावी व सदर मागणीच्या अनुषंगाने त्वरीत योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, असे निवेदन आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी ही मागणी तात्काळ मंजूर केली.

# उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात पंचायत समितीत खुर्चीला हार

## वंचित बहुजन आघाडी आक्रमक; उशिरा येणे, गैरहजेरी आणि सही करून पलायन

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२४, केज (बीड) :** केज पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थिती विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून, कार्यालयातील गैरशिस्तीचा निषेध म्हणून अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पंचायत समितीतील विविध विभागांमध्ये कार्यरत असलेले अनेक कर्मचारी नियमित वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. काही कर्मचारी सातत्याने उशिरा येतात, तर काही पूर्णतः गैरहजर राहत असल्याचे प्रकार घडत आहेत. तसेच काही कर्मचारी फक्त एकदाच येऊन हजेरी रजिस्टरवर सही करून उपस्थिती दाखवून पुन्हा




कार्यालयातून निघून जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सामान्य नागरिकांची कामे वेळेवर होत नाहीत. नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. शासकीय कार्यालयातील शिस्त, वेळेचे पालन व जबाबदारी यावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

या अनियमिततेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यावेळी अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदवण्यात आला. पंचायत समिती कार्यालयातील सर्व विभागांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सक्तीने लागू करावी, बायोमेट्रिक शिवाय कोणतीही उपस्थिती ग्राह्य धरू नये, वेळेचे पालन न करणाऱ्या व गैरहजर कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच गटविकास अधिकारी यांचे ड्युटी शेड्युल कार्यालयाबाहेर वारानुसार प्रदर्शित करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, सदर मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# मुख्यमंत्र्यानी दिले अप्पर मुख्य सचिव ऊर्जा यांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर तालुक्यातील मौजा विसापूर येथील बंद पडलेल्या पॉवर हाऊसच्या सुमारे ३१.३५ हेक्टर शासकीय जमिनीचा लोकहितासाठी उपयोग करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडला. मुंबई येथील वर्षा निवासस्थानी झालेल्या या भेटीत सादर केलेल्या सविस्तर निवेदनाची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव यांना तात्काळ कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश दिले. विसापूर येथील ही जमीन अनेक वर्षांपासून वापराविना पडून असून, भौगोलिक



स्थान आणि दळणवळणाच्या दृष्टीने ती सार्वजनिक उपक्रमांसाठी उपयुक्त असल्याचा मुद्दा निवेदनात आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला आहे. कामगारांच्या आरोग्यसुविधांसाठी १०० बेडेड ईएसआयसी अंतर्गत अत्याधुनिक रुग्णालयासाठी सुमारे ५ एकर जागा देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे चंद्रपूर व आजूबाजूच्या कामगारांना उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी राज्य राखीव पोलिस बल केंद्राकरिता सुमारे ४५ एकर जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला. या ठिकाणी प्रशिक्षण सुविधा, निवास व्यवस्था, क्रीडांगण, हॉस्पिटल, शाळा आणि नक्षलविरोधी मोहीमेच्या दृष्टीने आवश्यक अधोसंरचना उभारणे शक्य होणार आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी तिसऱ्या टप्प्यात महिला सहकारी औद्योगिक वसाहत उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यासाठी १० एकर जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. उद्योगासाठी आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यास मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन महिलांना स्वावलंबनाचा मजबूत आधार मिळेल, असे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण प्रस्ताव गांभीर्याने ऐकून प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. या निर्णयामुळे विसापूर परिसराचा सर्वांगीण विकास, कामगारांना दर्जेदार आरोग्य सुविधा, सुरक्षा यंत्रणेला बळकटी आणि महिलांसाठी नवे रोजगारक्षम क्षितिज निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल लोकनेते, विकासपुरुष आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष कौतुक व्यक्त केले जात आहे.

# अमृत २.० अंतर्गत घुग्घुस नगरपरिषदेच्या ७.०७ कोटींच्या सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास मंजुरी

## आ. किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत घुग्घुस नगरपरिषदेच्या ७ कोटी ७ लाखांच्या सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास मंजुरी मिळाली आहे. ही मंजुरी घुग्घुस शहराच्या सर्वांगीण, नियोजित व शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून घुग्घुस शहरातील पाणीपुरवठा यंत्रणेचे सर्वंकष नूतनीकरण व सुधारणा करण्यात येणार असून संपूर्ण यंत्रणेची सखोल तपासणी, आवश्यक दुरुस्ती तसेच काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना दीर्घकालीन, सुरळीत व सुरक्षित पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. घुग्घुस नगरपरिषदेच्या विकासासाठी आ. किशोर जोरगेवार हे सातत्याने प्रयत्नशील असून, त्यांच्या



नेतृत्वामुळे शहरातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याच्या दिशेने ही मोठी पायरी ठरणार आहे. सरोवर पुनरुज्जीवनामुळे पाणी साठवण क्षमता वाढणार असून पर्यावरण संतुलन राखण्यासही मोठी मदत होणार आहे. या महत्त्वपूर्ण विकासकामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शन, सहकार्य व पाठिंब्याबद्दल आ. किशोर जोरगेवार यांनी आभार व्यक्त केले आहेत.

ही विकासाची पायरी घुग्घुस शहराला नव्या उंचीवर नेणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून, भविष्यातही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी असेच भरीव उपक्रम राबविले जातील, केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत घुग्घुस नगरपरिषदेच्या सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास मंजुरी मिळणे ही घुग्घुस शहरासाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब आहे. शहराच्या भविष्यातील पाणीटंचाई दूर करून नागरिकांना दीर्घकालीन, स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे. घुग्घुसच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असून, या प्रकल्पामुळे केवळ पाणीपुरवठाच नव्हे तर पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत विकासकामे मार्गी लावण्याचा आमचा संकल्प असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

## बुलढाणा तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** बुलढाणा तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी तथा प्र. जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ.जयश्री ठाकरे, तहसीलदार विठ्ठल कुमरे, नायब तहसीलदार शशिकांत वाघ, अनंता पाटील यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. जयश्री ठाकरे यांनी ग्राहक संरक्षण कायदा, शासनाच्या योजना व सुविधांची माहिती देत, डिजिटल व्यवहारांमध्ये सायबर सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले. ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी प्रशासन सज्ज असून तक्रारींवर तत्काळ कार्यवाही केली जाते, असे त्यांनी स्पष्ट केले. तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी ग्राहक व विक्रेते यांच्यात पारदर्शक व्यवहार होणे आवश्यक असल्याचे नमूद केले

# थोडक्यात

## नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी नाम निर्देशन भरण्याची प्रक्रिया मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरु झाली असून ३० डिसेंबर हा नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिवस राहणार आहे. २३ ते २९ डिसेंबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत, तर ३० डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहे. २५ डिसेंबर रोजी ख्रिसमस व १८ डिसेंबर रोजी रविवार असल्याने या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रांचा स्वीकार करण्यात येणार नाही. नामनिर्देशन पत्रे प्रत्यक्षरित्या सादर करावयाची असून, प्रक्रियेसाठी ५ निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांना सहाय्यक म्हणून १५ सहाय्यक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांची ५ कार्यालये निश्चित केली असून, या केंद्रांवर प्रभागनिहाय नामनिर्देशन पत्रे दाखल करता येणार आहे.

**या केंद्रांवर दाखल करता येईल नामनिर्देशन पत्रे**

निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ - आत्मा प्रशिक्षण सभागृह, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) कृषी चिकीत्सालय यंत्रणा व रोपवाटिका परिसर, सिव्हिल लाईन, चंद्रपूर ( प्रभाग क्रमांक १,२ व ५), निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक २ - मनपा सभागृह, एम. बी. शाळेजवळ, कृष्णनगर, मुल रोड, चंद्रपूर (प्रभाग ३,४ व ६), निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ३ - मनपा झोन क्रमांक १ चे कार्यालय, संजय गांधी मार्केट, पहिला माळा, नागपूर रोड, चंद्रपूर (प्रभाग क्रमांक ७,८ व ९), निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ४ - मनपा झोन क्रमांक २ चे कार्यालय, सात मजली इमारत, पहिला मजला, गांधी चौक, चंद्रपूर ( प्रभाग क्रमांक १०,११, १२ व १५), निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ५ - मनपा नवीन अभ्यासिका, महादेव मंदिरासमोर, बाबुपेठ, (प्रभाग क्रमांक १३, १४, १६ व १७)

## के.रामलू शाळेत साने गुरुजी जयंती निमित्त कथा कथन स्पर्धा संपन्न



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२४, कुंडलवाडी (नांदेड) :** के.रामलू पब्लिक स्कूल येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पूज्य साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त कथाकथन, गीतगायन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्यामची आई या पुस्तकातील विविध कथा उत्कृष्टपणे विद्यार्थ्यांनी सादर केल्या. साने गुरुजी जयंती निमित्त शाळेच्या संचालिका कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.रमा ठक्कुरवार शाळेचे प्रिंसिपल जे संभाजी,व्हाय प्रिंसिपल एम सपना व कथामाला समिती प्रमुख कासलोड, डी.आर.हमंद यांच्या हस्ते साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उत्कृष्ट कथाकथन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी संस्कार कथा नीतिकथा साने गुरुजींच्या कथा सांगितल्या होत्या. या स्पर्धेला परीक्षक म्हणून कासलोड, डी.आर. हमंद यांनी काम पाहिले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डी.आर. हमंद असे म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे मुलांनी आता अधिकाधिक चांगले बोलले पाहिजे. चांगले लिहिले पाहिजे चांगले ऐकले पाहिजे तसेच संवाद कौशल्य वाढविले पाहिजे, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे! अशी खऱ्या धर्माची ओढ साने गुरुजींना होती आजच्या विद्यार्थ्यांना साने गुरुजींच्या साहित्याची माहिती व्हावी. याकरताच या स्पर्धेचे आयोजन केल्याचे डी.आर हमंद यांनी सांगितले व मार्गदर्शन केले आहे. यावेळी या कथा कथन स्पर्धेत शाळेतील ४५विद्यार्थी सहभागी झाले होते. ही स्पर्धा यशस्वी केल्यामुळे या शाळेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार व तसेच सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कुरवार यांनी सर्व शिक्षक कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन भास्कर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिता येन्नावार यांनी केले.

## बल्लारपुरात पार पडली जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धा




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २४ चंद्रपूर :** आपण मुली आहोत, याचा मनात संकोच ठेऊ नका. निर्भयपणे स्पर्धेला सामोरे जा... आपल्यातील कलाकौशल्याचे आत्मविश्वासाने सादरीकरण करा. यातूनच उंच भरारी घ्या, असा मौल्यवान सल्ला नागपूर येथील मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर प्राचार्य डॉ.नीता लांबे यांनी बल्लारपूर येथे जिल्हास्तरीय कनिष्ठ महाविद्यालय लोकनृत्य स्पर्धेच्या उदघाटन समारंभ दरम्यान दिनांक २३, डिसेंबर २०२५ रोजी केले. बल्लारपूर येथील एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या वतीने स्थानिक नाट्यगृहात जिल्हास्तरीय कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर लोकनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी सहभाग घेऊन लोकनृत्य आविष्काराचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी उदघाटक म्हणून डॉ.नीता लांबे बोलत होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चंद्रपूर येथील एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा, एस.एन.डी.टि.महिला विद्यापीठाचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सहाय्यक कुलसचिव डॉ.बाळू राठोड, समन्वयक डॉ.वेदानंद अलमस्त, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अश्विनी वाणी यांची उपस्थिती होती. दरम्यान विद्यार्थ्यांनीनी सादर केलेल्या लोकनृत्यांचे परीक्षक म्हणून नृत्य दिग्दर्शक डॉ.मानस रामटेके, रूपाली खाडीलकर, रूपाली भगत यांनी काम पाहिले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर, द्वितीय क्रमांक शासकीय उच्च माध्यमिक आश्रम शाळा देवाडा, तर तृतीय क्रमांक डॉ.खत्री कनिष्ठ महाविद्यालय, चंद्रपूर येथील चमुंनी पटकावला. विजेत्या स्पर्धकांना बीजीपिपीएलचे व्यवस्थापक प्रविण शंकर, लॉयड मेटल अँड एनर्जी सहाय्यक महाव्यवस्थापक विद्या पाल व अन्य मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रजनी पाल यांनी केले. आभार प्रा.अश्विनी वाणी यांनी मानले. यावेळी लोकनृत्य स्पर्धेला प्रेक्षकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.